नि.११४ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने वादी नं ३ चे वारस रेकॉर्डवर न घेतल्याने वादी नं ३ विरुध्द झालेला अवसान हुकूम (abatement order) रद्द करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, वादी नं ३ हे मयत झाले असुन त्यांचे वारसांनी वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज या मे कोर्टात दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जासोबत वादी यांनी विलंब माफीचा अर्ज देखील दाखल केलेला आहे. वादी यांनी मुदतीत वारस रेकॉर्डवर न घेतल्याने तांत्रीक दृष्टया दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे सदरच अबेटमेंटची ऑर्डर सेटसाईड करुन मिळण्यासाठी सदर अबेटमेंट ऑर्डर सेटसाईड झाल्यावर दाव्याची गुणदोषावर सुनावणी होणसे मदत होणार आहे. त्यामुळे सदर वादी तर्फे वादी नं ३ यांचे विरुध्द झालेला अवसान हुकूम (abatement order) रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दिले की, वादी यांनी दिलेले अबेटमेंट ऑर्डर सेटसाईड करण्यासाठी दिलेले कारण हे पुरेसे नसुन सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी नं ३ सुरेश सोनबा वीर यांचे मृत्युप्रमाणपत्राची प्रत पाहिली असता, प्रत वरुन असे दिसुन येते की,सदर वादी दि.०२/०३/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. कायदयाच्या तरतुदीनुसार सदर वादी यांचे मृत्युपासुन ९० दिवसामध्ये वादींचे वारस अभिलेखावर सामाविष्ठ करणे जरुरीचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ नुसार जर मयत पक्षकाराचे वारस विहीत कालावधीमध्ये अभिलेखावर सामाविष्ट केले नाही तर सदर दावा त्या पक्षकाराविरुध्द अवसान होतो. तसेच सदर तरतुदीनुसार वादीने अवसान रदद करण्याकरिता अर्ज केल्यास तसे समाधानकारक कारण असल्यास सदर अवसान रदद करता येते.

५. प्रस्तुत अर्जातील नमुद कारण व दाव्याचे स्वरुप ध्यानात घेता वादीने नमूद केलेली कारणे सदरचा अवसान हुकुम रदद करण्याकरिता समाधानकारक व संयुक्तीक आहे. सदरचा अवसान हुकुम रदद न केल्यास वादीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच दाव्याचे स्वरुप पाहता वादी नं ३ चे वारस दाव्यामध्ये सामील केल्यास सदरचा दावा

गुणदोषावर चालविण्यास मदत होणार आहे. वादीने नमुद केलेली कारणे ही वादी नं ३ विरुध्द झालेला अवसान हुकूम (abatement order) रदद करण्याकरिता समाधानकारक व संयुक्तीक आहेत. सबब वरील सर्व परिस्थिती, कारणमिंमासा व न्यायाचे उददिष्ट ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे उचित होईल. त्याप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येतो:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.११४) खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. वादीने वादी नं ३ चे वारस दाव्यात सामील करण्यास झालेला विलंब माफ करुन वादी नं ३ विरुध्द झालेला अवसान हुकूम (abatement order) रदद करण्यात आला. तत्पुर्वी वादीने प्रतिवादीस रक्कम रु.१०० वादखर्च दयावा.

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर

दिनांक :०४/०८/२०२२